# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक २१.०८.२०२६ शुक्रवार**

**१) सिसिटीव्ही संनिरीक्षण यंत्रणा प्रस्थापित करणेकरीता आयोजीत बैठक संपन्न :-**

महाराष्ट्र शासन गृह विभागाचे शासन निर्णयान्वये, मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे अध्यक्षतेखाली सिसिटीव्ही संनिरीक्षण प्रकल्प समीती स्थापीत करण्यात आलेली असुन, समितीची बैठक दिनांक २०.०८.२०२६ रोजी १२.३० वा. कॉन्फरन्स हॉल, ०६ वा माळा, पोलीस भवन, नागपूर शहर येथे आयोजीत करण्यात आली होती. बैठकीकरीता उपरोक्त कमीटी सदस्य मा. जिल्हाधिकारी यांचेकडील प्रतीनिधी, मा. महानगर पालीका आयुक्त/स्थानिक स्वराज्य संस्था प्रमुख, मा. पोलीस उपायुक्त, वाहतुक नागपुर शहर, मा. निवासी उपजिल्हाधिकारी, नागपुर, मा. पोलीस उपआयुक्त गुन्हे, नागपुर शहर यांचेव्यतीरिक्त मा. सहपोलीस आयुक्त, मा. अपर पोलीस आयुक्त गुन्हे, मा. पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा (ग्रामिण), मा. पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), मा. पोलीस उपआयुक्त परि. क्र. ५, निवासी उपजिल्हाधिकारी येथील प्रतिनिधी, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर व्यवस्थापक, स्मॉर्ट सिटी प्रकल्प, नागपूर, नगरपंचायत- हिंगणा, गोधणी, बिडगाव-तरोडी, निलडोह येरखेडा येथील मुख्याधिकारी तसेच, गोधनी बोखारा, कोराडी, महादुला, खापरखेडा, वलनी, दहेगाव, वाडी, वानाडोंगरी, हिंगणा, निलडोह, डिगडोह, खसाळा-मसाळा-भिलगाव-खैरी, खरबी-बहादुरा, बिडगांव, तरोडी-नरसाळा, कापसी-बाराव्दारी, येरखेडा, रनाळा, कामठी, खापरी, मिहान, जामठा, बेसा-पिपळा, हुडकेश्वर-नरसाळा, पिपळा-बेसा-बेलतरोडी, घोगली, शंकरपूर-बेसा-बेलतरोडी येथील अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची प्रस्तावना मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उप आयुक्त, गुन्हे यांनी सादर केली. तसेच, मा. पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा (ग्रामिण) यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात कार्यान्वीत करण्यात येणाऱ्या व आलेल्या सीसीटीव्ही संनिरीक्षण यंत्रणेच्या प्रकल्पाबाबत माहिती दिली. त्याचप्रमाणे, महाराष्ट्र शासन, संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग मुंबई यांचेकडील दि. ०५.१०.२०२३ चे पत्रान्वये सीसीटीव्ही संनिरीक्षक यंत्रणेचा ०५ वर्षासाठीचा डीपीआर तयार करणेकरीता नियुक्त केलेल्या मेसर्स Ernst & Young LLP, Mumbai यंत्रणेचे प्रात्यक्षिक पीपीटी दाखविणेकरीता प्रत्यक्ष हजर होते.

मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी, उभयतांनी दाखविलेल्या प्रात्याक्षिकाबाबत कमेटीतील सदस्य तसेच, इतर सदस्य व अधिकारी यांचे विचार तसेच, अभिप्राय जाणुन घेतले. त्या अनुषंगाने कमेटी सदस्यांनी मेसर्स Ernst & Young LLP, Mumbai यांनी सादर केलेले प्रात्याक्षिक योग्य असल्याबाबत सहमती दर्शविली.

नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात घडणाऱ्या वाहन चोरी, घरफोडी, हरविलेल्या महिला/ पळविले नाबालीक मुले-मुली अशा गुन्ह्यांवर आळा बसविण्याकीता तसेच, गुन्हयाचे व अपघाताचे वाढते प्रमाण पाहता त्याचप्रमाणे, आगामी सण, उत्सव, हिवाळी अधिवेशन व इतर प्रसंगी गोधनी बोखारा, कोराडी, महादुला, खापरखेडा, वलनी, दहेगाव, वाडी, वानाडोंगरी, हिंगणा, निलडोह, डिगडोह, खसाळा-मसाळा-भिलगाव-खैरी, खरबी-बहादुरा, बिडगांव, तरोडी-नरसाळा, कापसी-बाराव्दारी, येरखेडा, रनाळा, कामठी, खापरी, मिहान, जामठा,

बेसा–पिपळा, हुडकेश्वर–नरसाळा, पिपळा–बेसा–बेलतरोडी, घोगली, शंकरपूर–बेसा–बेलतरोडी अशा एकूण २७ ठिकाणी सीसीटीव्ही संनिरीक्षण यंत्रणा लवकरात लवकर प्रस्थापित करणे आवश्यक असल्याने मेसर्स Ernst & Young LLP, Mumbai यांचा पुर्वानुभव पाहता आणि पोलीस अधीक्षक, नागपूर जिल्हा (ग्रामिण) यांचे कार्यक्षेत्रात नमुद मेसर्सव्दारे सदरहू प्रकल्प प्रस्थापित करण्यात येत असल्याने, त्यांनाच नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात सीसीटीव्ही संनिरीक्षण यंत्रणा प्रस्थापित करणेसाठी साईट सर्व्हे तसेच, प्रकल्पासंबधीत इतर महत्वाचे कामाची पाहणी करून डीपीआर तयार करणेसाठी नियुक्ती करणेबाबत सीसीटीव्ही संनिरीक्षण प्रकल्प समितीने एकमताने सहमती दर्शविली व बैठकीचा समारोप करण्यात आला.

बैठकीमध्ये उपस्थितांसोबत मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. विनायक महामुनी, मुख्य कार्यकारी अधिकारी, नागपूर, मा. श्री. आदीत्य मिरखेलकर पोलीस उपआयुक्त, वाहतुक, नागपुर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उपआयुक्त, (गुन्हे), नागपुर शहर, मा. श्री. एम.एम. विराणी प्रतिनिधी निवासी उपजिल्हाधिकारी, नागपुर उपस्थीत होते.

**२) पोलीस आयुक्तालयातर्फे पोलीस आरोग्य तपासणी शिबिर संपन्न.**

मा. श्री. विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन व मार्गदर्शनाने पोलीस अधिकारी, अंमलदार तसेच, त्यांचे कुटुंबियांच्या आरोग्याची नियमित तपासणी करुन, आजारांचे निदान व प्रतिबंधात्मक योजना करण्याचे उद्येशाने आरोग्य तपासणी शिबिर कार्यक्रम आज दिनांक २१.०८.२०२६ चे सकाळी ०९.०० वा. पोलीस ठाणे लकडगंज येथे आयोजीत करण्यात आला होता. पोलीस अधिकारी व अंमलदार हे कर्तव्य बजावतांना सातत्याने आव्हानात्मक व तणावपुर्ण परिस्थितीत कार्यरत असल्याने त्यांच्या शारीरीक व मानसिक आरोग्याची काळजी घेणे, आजारांचे प्राथमिक अवस्थेत निदान करणे व निरोगी जिवनशैलीबाबत जागरुकता निर्माण करणे असा या शिबिराचा मुख्य उद्येश होता.

सदर आरोग्य शिबिराचे आयोजन हे मा. श्री राहुल मदने, पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. ३, मा. श्री शिवप्रसाद पारवे, सहायक पोलीस आयुक्त, लकडगंज विभाग यांचे देखरेखीखाली पार पडले. शिबिराचे यशस्वी आयोजनाकरीता वपोनि. श्री मुकुंद कवाडे, पोलीस ठाणे लकडगंज व लाईन दफेदार पोहवा. अविनाश सराफ यांनी परिश्रम घेतले. सदर शिबिरामध्ये सहभागी अधिकारी व अंमलदार यांची व त्यांचे परिवाराची बीएमआय तपासणी, रक्तदाब, रक्तातील साखर/मधुमेह तसेच, ह्यदय विकारांबाबत विविध प्राथमिक आरोग्य तपासण्या करण्यात आल्या. तपासणी दरम्यान आढळून आलेल्या आरोग्य विषयक तक्रारींवर शिबिराकरीता उपस्थित तज्ञ डॉक्टरांकडून आवश्यक ते मार्गदर्शन व पुढील उपचाराबाबत सल्ला देण्यात आला.





**३) मा. न्यायालयातुन आरोपीस २० वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा :–**

दिनांक २१.०८.२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपुर, श्री. एम. सलमान आझमी साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ३९९/२०२४ मधील, पोलीस ठाणे एमआयडीसी येथील अप. क्र. ४२४/२०२४

कलम ३७६(अ)(ब), ३७६(२)(एन) भा.दं.वि., सहकलम ४, ६ पोक्सो या गुन्ह्यातील आरोपी शेख शहजाद शेख शाहीद, वय १९ वर्षे, रा. वागदरा, ईसासनी, एमआयडीसी, नागपुर याचेविरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, आरोपीस कलम ३७६(अब), ३७६(२) भा.दं.वि., सहकमल कलम ६ पोक्सो अन्वये २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व १०,०००/—रू. दंड आणि दंड न भरल्यास ०६ महीने अतिरीक्त सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली.

दिनांक ०३.०५.२०२४ चे २३.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत राहणारे ३५ वर्षीय फिर्यादी यांची ०४ वर्षीय मुलगी पिडीता हीला वर नमुद आरोपीने चॉकलेटचे आमिष दाखवुन, पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत ईसासनी परीसरातील एका रूममध्ये नेवुन, तिचेसोबत अश्लील कृत्य केले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीस दिनांक ०९.०५.२०२४ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्हयाचे तपासी अधिकारी तत्कालीन पोउपनि. पवार साहेब यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती आसावरी परसोडकर यांनी काम पाहिले. सदर गुन्ह्यात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा. नितीन सिरसाट, गुरूदास ताडपल्लीवार यांनी काम पाहिले.

**(कामगिरी)**

**पोलीस ठाणे पाचपावली :— जबरी चोरीचा प्रयत्न करणाऱ्या पाहिजे आरोपीस अटक.**

दिनांक १४.०८.२०२६ चे १३.३० वा. चे सुमारास, फिर्यादी रुद्र संदीप सत्याल वय १८ वर्षे, रा. आफताब रोड, बापुनगर, अकोला हे त्यांचे नातेवाईकाकडे नागपूर येथे मुक्कामी असतांना, आरोपी क्र. १) त्रिशु उसरबरसे वय २१ वर्ष रा. पाचपावली याने फिर्यादीस तनिषा हाटे नावाचे मुलीसोबत फोनवरुन बोलण्याचे कारणावरुन, त्याचे दुचाकीवर फिर्यादीस बसवुन पोलीस ठाणे पाचपावली हद्यीतील तांडापेठ, कार्पोरेशन शाळेजवळ नेले. तेथे आरोपी क्र. १ व २) बिट्टु समशेरीया वय २७ वर्ष रा. पाचपावली, नागपूर यांनी संगनमत करुन फिर्यादीस हातबुक्कीने मारहाण केली. तेथून आरोपींनी फिर्यादीस भोलेनाथ मंदीरसमोर आणुन, तिथे फिर्यादीस चाकुचा धाक दाखवून फिर्यादीजवळील मोबाईल हिसकावण्याचा प्रयत्न केला. फिर्यादीने प्रतिकार केला असता, तिथे त्यांचे नातेवाईक आल्याने, आरोपी फिर्यादीस शिवीगाळ करून तेथून पळून गेले. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे आरोपीविरूध्द कलम ३१२,११५(२),३५१,३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. यापुर्वी आरोपी क्र. १ यास अटक करण्यात आली होती व आरोपी क्र. २ हा मिळुन न आल्याने गुन्हयात पाहिजे आरोपी होता.

गुन्ह्याचे अधिक तपासात पाचपावली पोलीसांनी तांत्रिक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून आरोपी अजय उर्फ बिट्टु रामसेवक समशेरीया वय २४ वर्ष रा. बापुकुटी नगर, दुर्गा माता मंदीरजवळ, पाचपावली, नागपूर यास सापळा रचुन ताब्यात घेतले. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राहुल मदने, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ३), मा. श्री. शिवप्रसाद पारवे, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग), वपोनि. बाबुराव राऊत यांचे मार्गदर्शनाखाली, सपोनि. सचिन भोंडे, पोहवा. मुकेश यादव, सुशिल रेवतकर, रविंद्र राऊत, पोअं. अमित ठाकुर यांनी केली.

**(गुन्हे)**

**पोलीस ठाणे कपीलनगर :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २१.०८.२०२६ चे १०.०० ते १०.४० वा. चे दरम्यान, फिर्यादीची बहीण नामे अंजली रविशंकर पांडे वय २८ वर्षे रा. प्लॉट क्र. सी—४४, वैष्णोदेवी नगर, कळमणा नागपुर हया त्यांचे ओला एस १ इलेक्ट्रीक

दुचाकी क्र. एमएच ४९ सीसी ६०१८ ने आपले ब्युटी पार्लर येथील जॉबकरीता जात असतांना, पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत, सायोना पब्लिक स्कुलसमोर, कामठी रोड येथे शहरबस क्र. एम.एच. ४० डीसी २६५२ चा चालक आरोपी नामे जितलाल परमलाल नेवारे वय ४० वर्षे रा. कपीलनगर, नागपुर याने त्याचे ताब्यातील बस भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे बहिणीचे दुचाकीला धडक दिल्याने ती खाली पडून बसचे मागील चाकात आल्याने गंभीर जखमी झाली. आरोपी बसचालक घटनास्थळी बस सोडून पळून गेला. जखमी हिला उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी तीला तपासुन मृत घोषित केले.

यात्रकरणी फिर्यादी प्रफुल रविशंकर पांडे वय २३ वर्षे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कपीलनगर येथे पोउपनि जयराम देशमुख यांनी आरोपी शहरबस चालकाविरूध्द कलम १०६(१),२८१ भा.न्या.सं. सहकलम १३४,१८४,१८७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>१) पोलीस ठाणे सोनेगाव</u> :–** दिनांक २१.०८.२०२६ चे १०.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सोनेगाव हद्दीतील सोनेगाव तलावाचे पाण्यात इसम नामे अजय कुंवरलाल कटरे वय ३१ वर्ष रा. जुनी वस्ती सोनेगाव, गोंड वस्ती, नागपूर यांचा मृतदेह तरंगतांना मिळुन आला. प्रेतास फायर ब्रिगेडचे मदतीने पाण्याबाहेर काढून पुढील कार्यवाहीस्तव एम्स हॉस्पिटल येथे पाठविण्यात आले आहे.

यात्रकरणी फिर्यादी श्रीमती भुमिका राजेश रहांगडाले वय ३४ वर्षे, रा. जुनी वस्ती सोनेगाव, गोंड वस्ती, नागपुर यांनी दिलेल्या सुचनेवरून पोलीस ठाणे सोनेगाव येथे मपोउपनि. ज्योती कोकणी यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे अजनी</u> :–** दिनांक २०.०८.२०२६ चे १८.४७ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे अजनी हद्दीतील, मेडीकल हॉस्पिटल परिसरातील पोस्ट ऑफीस जवळील सायकल स्टॅन्डचे गेटसमोरील फुटपाथवर एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ६० वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. वर्णन–रंग सावळा, बांधा–सडपातळ, केस–पांढरे, दाढी मिशी वाढलेली, अंगात–आकाशी रंगाचा शर्ट, ओळख–उजवे हातावर अस्पष्ट गोंदण आहे. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे अजनी येथे संपर्क साधावा.

यात्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे अजनी येथे मपोउपनि. मनिषा झांझुर्णे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>१) पोलीस ठाणे मानकापुर</u> :–** राकेश सुखदेव खुरजे वय ३८ वर्ष रा. प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर हे दिनांक २४.०७.२०२६ चे ११.३० वा. पासुन पोलीस ठाणे मानकापूर हद्दीतील प्रादेशिक मनोरुग्णालय, नागपूर येथून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. रुग्णालयात परत आले नाहीत. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग–सावळा, चेहरा–लांबट, बांधा–मध्यम, उंची– ५ फुट ६ इंच, केस–काळे, डोळे–काळे, अंगात– निळया रंगाची टिशर्ट व निळा जिन्सपॅन्ट घातलेला आहे. भाषा– मराठी बोलतात.

**<u>२) पोलीस ठाणे अजनी</u> :–** पदमसिंग बाबुसिंग चव्हाण वय ६७ वर्ष रा. धाडीवाल ले आऊट, प्लॉट क्र. १०४, पार्वती नगर, अजनी, नागपूर हे दिनांक १९.०७.२०२३ चे १३.०० वा. पासुन पोलीस ठाणे अजनी हद्दीतील राहते घरुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. अद्यापपावेतो परत आले नाहीत. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **<u>वर्णन</u>** रंग–सावळा, चेहरा–लांबट, बांधा–सडपातळ, उंची– ५ फुट ७ इंच,

केस—पांढरे व डोक्याचे वरील भागास टक्कल पडलेले, अंगात— क्रिम रंगाचा फुलशर्ट व कत्था रंगाचा पॅन्ट घातलेला होता. भाषा— हिंदी बोलतात.


राकेश


पदमसिंग

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**